# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

वर्ष-४

अंक - ३७

epaper.diwanews.com

www.diwanews.com ♦ सोमवार,१४ एप्रिल २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किमंत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


**पहिल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण**

२१ ते २४ एप्रिल दरम्यान चित्रपताका नावाने होणार महोत्सव... (पान ६वर)



# जनसमर्थन पत्रकार : डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**१८व्या** आणि १९व्या शतकात इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी आणि अन्य पाश्चिमात्य राष्ट्र आणि भारतामध्ये ज्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय चळवळी किंवा परिवर्तन झालीत, त्यात वृत्तपत्राचे योगदान मोलाचे आहे.

जागतिक, राष्ट्रीय आणि स्थानिक घडामोडी समाजापर्यंत येणारे वृत्तपत्र हे एक प्रमुख साधन होते आणि आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठसंपादकांनी घेतलेली स्वयंदीक्षा म्हणजे पत्रकारिता होयठ असे म्हटले आहे. वृत्तपत्रे किंवा पत्रकारिता म्हणजे वर्तमानाची व्याख्या करणारी आणि भविष्य घडविणारी एक घटना आहे.

वृत्तपत्रामुळे समाजातील निर्भयता, स्पष्टपणा आणि स्वातंत्र्याचा उदय होतो. मानवी समाज वृत्तपत्रातील घटना, लेख-अग्रलेख वाचून प्रभावित होतो. अर्थातच त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, त्याप्रमाणे संपादकाला स्वयंदीक्षा घ्यावी लागते. कारण संपादकाच्या बौद्धिक, सामाजिक, जागृती आणि जाणीवेवरच हे सगळं अवलंबून असते. वृत्तपत्रांच्या कार्यानुसार आणि पत्रकाराच्या ध्येयानुसार पत्रकारितेला विविध भागात विभागीत करण्यात आले आहे. त्यात ॲडव्होकेसी जर्नालिझम' म्हणजे जनसमर्थन पत्रकारिता ही महत्त्वाची पत्रकारिता आहे.

'ॲडव्होकेसी जर्नालिझम' मध्ये पत्रकार एखाद्या विषयावर ठाम भूमिका घेतात आणि त्यांच्या लिखाणाने वाचक किंवा प्रेक्षकांना त्यांचा दृष्टिकोन स्वीकारण्यासाठी प्रवृत्त करतात. सामाजिक प्रश्न वा समस्या सोडवणुकीसाठी न्याय मिळवून देईपर्यंत सातत्यपूर्ण केलेली पत्रकारिता म्हणजे 'ॲडव्होकेसी जर्नालिझम' जनसमर्थन पत्रकारिता होय. या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा विचार करता, भारताला राष्ट्र म्हणून उभे राहायचं असेल, जगायचे असेल, तर सर्वप्रथम भारतातल्या प्रत्येक माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी प्राप्त करून द्यावी लागेल. हा ऐतिहासिक महामंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेने जगाला दिलेला आहे. माणूसपणाच्या भोवती असलेली विषबंदी, तिचा त्याग करण्याचा संकल्प प्रत्येक भारतीयांनी करून राष्ट्रभक्ती, राष्ट्रशक्ती, राष्ट्रनिष्ठा आणि राष्ट्राच्या ऐक्याचा संकल्प करावा, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकूणच पत्रकारितेचे उद्दिष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनाचा दृष्टिकोन स्वीकारून तत्कालीन स्पृश्य-अस्पृश्य समाज, राजकीय नेते, त्यांचे राजकीय विचार प्रवाह आणि ब्रिटिश सरकार यांच्या परस्पर वैचारिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, द्वन्दाची अधिक सटीक पद्धतीने मांडणी करून समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी न्याय मिळवून दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वलिखित अग्रलेखातील विविध पैलू हे समकालीन इतर पत्रकारांच्या पेक्षा भिन्न आहेत. त्यांची दृष्टी, विषय मांडणी, दूरदृष्टीची परिणामकारकता भेदक आणि मार्मिक आहे. त्यांचे लेखन बहुआयामी बहुविषयी स्पर्शित आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जनसमर्थन पत्रकारितेने माणूस घडविण्याच्या आणि एक नवीन भारत निर्मितीच्या महान क्रांतिकारी कार्यात अमूल्य योगदान दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा विचार करता १९२० ला त्यांनी 'मूकनायक' द्वारे मुक्यांना बोलके केले, तर 'बहिष्कृत भारत' ने बहिष्कृत समाजाला प्रबोधित करून अन्यायाविरुद्ध संघर्षासाठी तयार केले. याच बहिष्कृत भारतातील जनतेला त्यांच्या 'जनता' ने अधिकारांची आणि न्याय हक्काची जाणीव करून दिली. या देशातील मुक असलेल्या माणसाची प्रगती अशा पद्धतीने करत, माणसाला प्रबुद्ध नागरिक आणि देशाला प्रबुद्ध भारत बनविण्याचे महान कार्य 'प्रबुद्ध भारता'तून त्यांनी केले आहे. त्यामुळेच एक नवा इतिहास घडला. असे कार्य त्यांच्या जनसमर्थन पत्रकारितेमुळे घडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचे उद्दिष्ट समाज परिवर्तन, समाज सुधारणा करणे, हे असल्यामुळे त्यांनी लोकप्रबोधन आणि लोक शिक्षण, सामाजिक जाणिवेच्या अनुषंगाने आपल्या अग्रलेखांचे लेखन केले आहे. त्या विषयाच्या मांडणीमध्ये त्यांचे सामाजिक परिवर्तन हेच ध्येय आहे. एकूण समग्र परिवर्तन आणि मानवी कल्याणाचे ध्येय हस्तगत करण्यासाठीच त्यांनी अग्रलेखाचे लेखन केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्राला एकसंघ ठेवण्यासाठी महान राज्यघटना देऊन, एक स्वयंपूर्ण लोकशाही लोकराज्य म्हणून निर्माण केले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने ते जनसमर्थन पत्रकारितेचे जनक ठरतात.

**-प्रा. संजय घरडे**
९१३०३७७५११

संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती




हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

## राम गणेश गडकरी रंगायतन मे महिन्यात ठाणेकरांच्या सेवेत दाखल करा : खा.नरेश म्हस्के यांच्या प्रशासनाला सूचना

**ठाणे** : ठाण्याचे भूषण व सांस्कृतिक ओळख असलेले समस्त नाट्यकलावंताचे हक्काचे व्यासपीठ ठरलेले राम गणेश गडकरी रंगायतन मे महिन्यामध्ये ठाणेकरांच्या सेवेत दाखल करण्याच्या सूचना देत असतानाच कामाची गती वाढविण्याचे निर्देश मंगळवारी झालेल्या पाहणी दौऱ्यात खासदार नरेश म्हस्के यांनी प्रशासनाला दिले. ज्येष्ठ नागरिकांसाठी लिफ्टची सोय, नाट्य व सिनेमांसाठी लागणारी ध्वनी व्यवस्था, आरामदायी आसनव्यवस्था, अशा अत्याधुनिक सोईंनी ठाणेकरांसाठी सज्ज होत असून आतापर्यंत महापालिकेने केलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच रंगकर्मींना गैरसोय होणार नाही यासाठी त्यांना आवश्यक असलेल्या सर्व आवश्यक असलेल्या बाबींचा अंतर्भाव करण्याच्या सूचनाही खासदारांनी यावेळी दिल्या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार खासदार नरेश म्हस्के यांनी राम गणेश गडकरी रंगायतनच्या कामाची पाहणी केली.






## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने एसटी कर्मच्याऱ्यांच्या पगाराचा प्रश्न सोडवण्यात यश

**मुंबई :-** एसटी कर्मचाऱ्यांचा उर्वरित ४४ टक्के पगार येत्या मंगळवार पर्यंत देण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासाठी पुढाकार घेऊन वित्त सचिवांशी केलेल्या चर्चेअंती एसटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन लवकरच अदा करण्याची त्यांनी तयारी दर्शवली आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्याचे फक्त ५६ टक्के वेतन मिळाल्याचे वृत्त पसरल्यामुळे एसटी कर्मच्ऱयांनी याबाबत नाराजी व्यक्त केली होती. आज सांगोला तालुक्याच्या दौऱ्यावर असताना उपमुख्यमंत्री शिंदे यांची काही एसटी कर्मच्याऱ्यांनी भेट घेऊन आपले उर्वरित वेतन लवकरच देण्याची मागणी केली होती. या मागणीची तत्काळ दखल घेऊन या प्रश्नावर शिंदे यांनी राज्याचे वित्त सचिव ओमप्रकाश गुप्ता यांच्याशी फोनवरून चर्चा केली. या चर्चेअंती एसटी कर्मच्ऱयांचे या महिन्याचे उर्वरित ४४ टक्के वेतन येत्या मंगळवारपर्यंत अदा करण्यात येईल असे गुप्ता यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या पुढाकाराने एसटी कर्मच्ऱयांना दिलासा मिळाला असून त्यांच्यावरील वेतन कपातीचे संकट दूर होण्यास मदत झाली आहे.













युगपुरुष, बोधीसत्व, भारतरत्न
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांच्या १३४ व्या
जयंतीनिमित्त
सर्वांना मंगलमय
शुभेच्छा !
१४ एप्रिल
प्रकाश पाटील - विभाग अध्यक्ष
महाराष्ट्र नवनिर्माण सेना


महामानव, भारतरत्न, परमपुज्य,
भारतीय घटनेचे शिल्पकार
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १३४ व्या
जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम !
१४ एप्रिल
शिवसेना
शैलेश मनोहर पाटील
दिवा उपशहर प्रमुख / मा. नगरसेवक

# हरित आच्छादने आणि तात्पुरत्या पाणपोयींची सुविधा वाढवा - पालिका आयुक्तांचे निर्देश

**ठाणे :** उन्हापासून बचाव होण्यासाठी मोठ्या सिग्नलपाशी लावण्यात आलेली हरित आच्छादने आणि तात्पुरत्या पाणपोई यांच्याबद्दल नागरिकांनी ठाणे महापालिकेस सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे, आवश्यकतेनुसार या दोन्ही सुविधांची संख्या वाढवण्याचे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पर्यावरण विभाग यांना दिले आहेत.



ठाणे महापालिका क्षेत्रासाठी उष्णता कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार, गतवर्षीपासून महापालिकेतर्फे स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने तात्पुरत्या पाणपोई सुरू करण्यात येतात. यंदाही अशा २५ पाणपोई सुरू करण्यात आल्या आहेत. त्याला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद असून त्यांची संख्या वाढवण्याची गरज आहे. त्यामुळे, स्वयंसेवी संस्था आणि लोकसहभागातून ही संख्या वाढवण्यात यावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत.

तसेच, तीन हात नाका (२), अल्मेडा चौक (०१) खोपट (२), नितीन कंपनी (१) या सहा ठिकाणी वाहनचालकांना उन्हापासून काहीसा दिलासा मिळावा यासाठी हरित आच्छादनांची व्यवस्था महापालिकेमार्फत करण्यात आली आहे. आता ठाणे महापालिका क्षेत्रात जिथे ६० सेकंदांपेक्षा जास्त वेळेचा सिग्नल आहे, अशा ठिकाणी हरित आच्छादनांची व्यवस्था करावी, असेही निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत.

राज्य शासनाच्या १०० दिवस कार्यक्रमाची प्रगती, उष्णतेच्या लाटेबाबतच्या उपाययोजना, स्वच्छ सर्वेक्षण, इ-ऑफिस कार्यप्रणालीची अमलबजावणी आदी विषयांचा आढावा महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी गुरूवारी महापालिका मुख्यालय येथे झालेल्या विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीत घेतला. कै. अरविंद पेंडसे सभागृह येथे झालेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, नगररचना सहाय्यक संचालक संग्राम कानडे, उपायुक्त मनीष जोशी, उमेश बिरारी, जी. जी. गोदेपुरे, दिनेश तायडे, शंकर पाटोळे, सचिन सांगळे, मधुकर बोडके, अनघा कदम, पद्मश्री बैनाडे यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

## पावसाळा पूर्व तयारी बाबतही दिल्या सूचना

पावसाळ्याच्या पूर्व तयारीच्या दृष्टीने होत असलेली झाडांच्या धोकादायक फांद्यांची छाटणी, नालेसफाईच्या कामांची निविदा प्रक्रिया, तसेच खड्डेमुक्त ठाणे मोहिमेच्या प्रगतीचा आढावा या बैठकीत आयुक्त राव यांनी घेतला. वारंवार खड्डे पडणाऱ्या ठिकाणांची आधीच पाहणी करून तेथे प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. त्यासाठी काही नाविन्यपूर्ण तोडगे काढता आले तर पहावे. जेणेकरून नागरिकांना खड्ड्यांचा सामना करावा लागणार नाही. तसेच, रस्ता नादुरुस्त असल्याची तक्रार आल्यापासून २४ तासांच्या आत ती तक्रार मार्गी लागेल यासाठी गेल्यावर्षीप्रमाणेच सर्व यंत्रणांना समन्वय ठेवावा, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

# मनसेचे प्रकाश पाटील यांनी दिवा डम्पिंगवर कचरा टाकण्यासाठी आलेल्या गाडीची हवा काढली व हेडलाईट फोडले



पुन्हा कचरा टाकल्यास तीव्र आंदोलनाचा मनसेचा इशारा

**दिवा**:- दिवा शहरातील डम्पिंग ग्राउंड बंद झाल्याची घोषणा झाली.मात्र अधून मधून या ठिकाणी महापालिकेच्या कचरा गाड्यातून कचरा टाकला जात असल्याचे प्रकार घडत असून याला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी जोरदार विरोध केला आहे. गुरुवारी दिवा डम्पिंग ग्राउंडवर कचरा टाकण्यासाठी आलेल्या गाड्या प्रकाश पाटील यांनी अडवून सदर कचऱ्याच्या गाड्यांची हवा काढली व एका कचऱ्याच्या गाडीचा हेडलाईट फोडून तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. मनसेच्या एकंदरीत आक्रमक भूमिकेमुळे दिवा डंपिंग प्रश्न पुन्हा पेटण्याची चिन्ह या निमित्ताने निर्माण झाली आहेत.

दिवा डंपिंग ग्राउंड बंद झालेले असतानाही या ठिकाणी डायघर डम्पिंग येथील व ठाणे शहरातील कचरा आणून टाकला जात असल्याचा आरोप मनसेचे प्रकाश पाटील यांनी केला आहे. दिवा डम्पिंग ला मागील अनेक वर्षांपासून येथील रहिवाशांनी विरोध केल्याने अखेर हे डम्पिंग ग्राऊंड बंद करण्यात आले होते.मात्र मागील काही दिवसांपासून छुप्या मार्गाने येथे कचरा डंप होत असल्याचा आरोप मनसेचे प्रकाश पाटील यांनी केला आहे. कचरा टाकण्यासाठी आलेल्या कचऱ्याच्या गाड्या अडवून मनसेचे प्रकाश पाटील यांनी सदर कचरा गाड्यांचे टायर पंचर केले व १५ तारखेनंतर या ठिकाणी कचरा टाकण्यासाठी महापालिकेच्या गाड्या आल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा मनसेचे विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी दिला आहे.

# पहिल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण


**मुंबई:** 'मराठी सिनेमाची चित्रपताका घेऊन अटकेपार जाणारा मावळा या अर्थाने राज्याच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट महोत्सवाचे नाव 'चित्रपताका' असे ठेवण्यात आले आहे. त्याचेच प्रतिकात्मक रूप बोधचिन्हात उमटले असून घोड्यावर बसलेला, हातात पताका आणि रिळ स्वरूपातील ढाल घेऊन पुढे चाललेला मराठी चित्रपटकर्मी मावळा या बोधचिन्हात आहे' अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी मंगळवारी प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे कला अकादमीत झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

**२१ ते २४ एप्रिल दरम्यान 'चित्रपताका' नावाने होणार महोत्सव**

महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ आणि पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी चित्रपट महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. या पत्रकार परिषदेत महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी गीता देशपांडे, वित्तीय सल्लागार- मुख्य लेखा वित्त अधिकारी चित्रलेखा खातू रावराणे, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, तसेच महोत्सवाचे संचालक ज्येष्ठ निर्माते, दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे उपस्थित होते. २१ ते २४ एप्रिल दरम्यान पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे ' चित्रपताका ' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 'मराठी चित्रपटसृष्टीचे प्रतिनिधित्व करणारी एक झळाळती पताका म्हणजेच 'चित्रपताका' ही संकल्पना या महोत्सवामागे आहे. प्रेक्षक आणि मराठी सिनेमा घडवणारे लेखक, दिग्दर्शक, निर्माते,सर्व चित्रकर्मी अशा घटकांचा हा महोत्सव असणार आहे' असे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी स्पष्ट केले.

या चार दिवसांच्या चित्रपट महोत्सवात एकूण ४१ दर्जेदार मराठी चित्रपट दाखवले जाणार आहेत. या चित्रपटांमध्ये पूर्ण लांबीचे सामाजिक, ग्रामीण, ऐतिहासिक, पर्यावरण विषयक, स्त्री जीवना विषयक प्रश्न मांडणारे चित्रपट, बालचित्रपट, विनोदी अशा विविध जॉनरच्या चित्रपटांचा समावेश आहे.


चित्रपटांची निवड करण्यासाठी डॉ.संतोष पाठारे, सुकन्या कुलकर्णी, समीर आठल्ये आणि पुरुषोत्तम बेर्डे या तज्ज्ञांची निवड समिती नेमण्यात आली होती. या महोत्सवात चित्रपट क्षेत्रातील विविध विषयांवर पाच परिसंवाद, दोन मुलाखती आणि दोन कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. सिने पत्रकारांसाठी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. तसेच, मराठी चित्रपटांविषयीचे प्रदर्शनही या महोत्सवात असणार आहे. पद्मश्री महाराष्ट्र भूषण अशोक सराफ, सचिन पिळगावकर, महेश मांजरेकर, महेश कोठारे, वर्षा उसगावकर, सुबोध भावे, अलका कुबल यांच्यासह चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवर महोत्सवास उपस्थित राहणार आहेत, अशी माहितीही सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी दिली. नवे आणि जुने चित्रकर्मी, उत्तम प्रेक्षक यांना एकत्र आणणारा, मराठी चित्रसृष्टीचा हा चार दिवसांचा सोहळा असणार आहे. 'चित्रपताका'च्या माध्यमातून मराठी सिनेमा साता समुद्रपार पोहोचावा, आणि ही घोडदौड यापुढेही अशीच सुरु राहावी, हीच या महोत्सवामागील प्रेरणा आहे. हा महोत्सव विनामूल्य असून ऑनलाईन वा प्रत्यक्ष कला अकादमी येथे येऊन महोत्सवासाठी नावनोंद करणे गरजेचे आहे. सर्व मराठी चित्रपट रसिकांना या महोत्सवाला हजेरी लावण्याचे आवाहन ह्या वेळी माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केले.


१४ एप्रिल
हजारो वर्षांची परंपरा एका सहीने मोडून तमाम जनतेला आपल्या हक्काची जाणीव करुन देणारे
युगप्रवर्तक, भारतीय घटनेचे शिल्पकार,
महामानव,भारतरत्न
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांच्या १३४ व्या
जयंतीनिमित्त
सर्वांना मंगलमय
शुभेच्छा !
डी. के. जाधव
बौध्दाचार्य


भारतीय घटनेचे शिल्पकार, युगप्रवर्तक
डॉ. बाबासाहेब
आंबेडकर यांना
१३४ व्या
जयंतीनिमित्त
कोटी कोटी प्रणाम !
१४ एप्रिल
सचिन राम पाटील - शहर प्रमुख दिवा शहर
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे


ACE NX HOSPITAL &
RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital
२५,००० ते २,००,००० पर्यंत विमा योजना
मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund
फुफ्फुस प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
अपघात शस्त्रक्रिया
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
अपघात
हृदयरोग
डायलिसिस
हाताचे प्रत्यारोपण
मूत्रपिंडाचे प्रत्यारोपण
विद्युत अपघात रुग्ण
नवजात शिशुंचे आजार
बर्न रुग्ण
मेंदूचे आजार
कर्करोग शस्त्रक्रिया
Address
Emergency
7777008464
9076229076


क्रांतीसुर्य,
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
१४ एप्रिल
डॉ. बाबासाहेब
आंबेडकर यांना
१३४ व्या जयंतीनिमित्त
कोटी कोटी प्रणाम !
तुषार भास्कर पाटील
शहर अध्यक्ष, दिवा शहर
महाराष्ट्र नवनिर्माण सेना


युगपुरुष, बोधीसत्व, भारतरत्न
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
१४ एप्रिल
महामानव
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना
१३४ व्या
जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन !
शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे
ज्योती राजकांत पाटील दिवा शहर महिला संघटिका
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे